विद्युत विभाग

दिनांक :- ०३-०९-२०२५

# * साईभक्तांना विनम्र आवाहन *


श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

पोस्ट :- शिर्डी – ४२३ १०९, ता.राहाता, जि.अहिल्यानगर

फोन नं.-०२४२३-२५८९८९,२५८९९८ फॅक्स नं.-२५८८७०

E-Mail -electrical.dept@sai.org.in ,website: - www.sai.org.in


---

## * साईभक्तांना विनम्र आवाहन *

**श्री साईबाबा संस्थान मार्फत साजरे करणेत येणा-या ''श्री पुण्यतिथी उत्सव-२०२५''निमित्त दि.०१-१०-२०२५ ते दि.०४-१०-२०२५ या कालावधीत** संस्थानचे खालीलप्रमाणे इमारतींचे दर्शनी भागावर (विनामुल्य) देणगी स्वरुपात आकर्षक अशी विद्युत रोषणाई सजावट करण्याचे नियोजन आहे.

अ)
- **(०१) मंदिर परिसर बाहेरील बाजू (नगर मनमाड रोड )**
- **(०२) शांतिनिवास व भक्तनिवास इमारत**
- **(०३) नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम)**
- **(०४) साईआश्रम भक्तनिवास**
- **(०५) साई धर्मशाळा**
- **(०६) द्वारावती भक्तनिवास**
- **(०७) श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय**
- **(०८) श्री साई प्रसादालय**
- **(०९) नविन दर्शन लाईन**

तरी, सर्व साईभक्तांना व विविध लाईटींग डेकोरेटर्स यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत आव्हान करणेत येते की, **जे साईभक्त अथवा विविध सजावट करणारे लाईटींग डेकोरेटर्स हे उपरोक्त अ.क्र.०१ ते अ.क्र.०९ या विविध इमारतीवर दि.०१-१०-२०२५ ते दि.०४-१०-२०२५ या कालावधीत देणगी स्वरुपात (विनामुल्य) विद्युत रोषणाई करणेस इच्छूक असतील** असे साईभक्तांनी अथवा विविध सजावट करणारे लाईटींग डेकोरेटर्स यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे नांवे अर्ज करुन सदर अर्जाची सॉफ्ट कॉपी संस्थानचे ई-मेल electrical.dept@sai.org.in , kishor.gawali@sai.org.in वर तसेच हार्ड कॉपी दि ११-०९-२०२५ रोजी सायं.५:०० वा.पर्यंत अथवा तत्पुर्वी संस्थान कार्यालयात जमा करावीत. ( संस्थान मार्फत लायटींग डेकोरेटर्स यांची राहण्याची, चहा, सकाळचा नाष्टा, व दोन वेळचे जेवणाची सोय **"विनामुल्य"** करण्यात येईल.)

(ब) उपरोक्त (अ) मधील ''श्री पुण्यतिथी उत्सव-२०२५'' निमित्त दि.०१-१०-२०२५ ते दि.०४-१०-२०२५ या कालावधीत संस्थानचे विविध इमारतींचे दर्शनीभागावर आकर्षक अशी विद्युत रोषणाई करणेसंबधीत काम साईभक्त अथवा विविध सजावट करणारे लाईटींग डेकोरेटर्स विनामुल्य करण्यास तयार नसल्यास त्यांनी संस्थानला सदरकामी येणाऱ्या खर्चाचे दरपत्रक दि ११-०९-२०२५ रोजी सायं.५:०० वा.पर्यंत अथवा तत्पुर्वी संस्थान कार्यालयात जमा करावीत.

***खालीलप्रमाणे अटी-शर्तीस अधिन राहून काम करणे बंधनकारक राहील.***

०१). विद्युत रोषणाई करतांना सुरक्षा नियमांचे पालन करावे.

०२). सदरचे काम चालू असतांना साईभक्तास / विद्युत रोषणाई करणारे डेकोरेटर्स यास कोणतीही इजा होणार नाही यांची काळजी घेणेची संपुर्ण जबाबदारी आपणावर राहिल.

०३). विद्युत रोषणाई करतांना अथवा त्यानंतर सदर कामामुळे काही अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

०४). विद्युत रोषणाईचे कामामुळे वरील इमारतींचे काहीही नुकसान होऊ नये याची खबरदारी घ्यावी.

०५). विद्युत रोषणाई करतांना योग्य ती खबरदारी घेणे आपणांवर बंधनकारक राहिल.

०६). दि.३०-०९-२०२५ रोजी सर्व इमारतीचे दर्शनीभागावर आकर्षक अशी विद्युत रोषणाईचे काम पुर्ण करुन रोषणाईची टेस्टींग देणे आपणांवर बंधनकारक राहील.

(गोरक्ष गाडीलकर,भा.प्र.से.)

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**



Scanned with OKEN Scanner